**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ५३ दिनांक २६/०९/२०२४**

# १९ वा कोकण परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२४ सांगता समारोह कार्यक्रम

पालघर जिल्हा पोलीस आयोजीत १९ वा कोकण परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा सन २०२४ दिनांक २४/०९/२०२४ ते दिनांक २६/०९/२०२४ रोजी दरम्यान संपन्न झाला. सदर स्पर्धेमध्ये कोकण परिक्षेत्रातील ५ घटकांकडून पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सहभाग नोंदविला. सदर मेळाव्याकरीता **1) Scientific Aids to Invastigation, 2)Police Photography, 3) Police Videography, 4) Anti-Sabbotage Check, 5) Computer Awareness, 6) Dog Squad Competition** असे मुख्य विषय व त्यांचे २४ उपप्रकारांवर लेखी, तोंडी तसेच प्रात्यक्षिक परिक्षेचे आयोजन करुन सदर विषयांचे तज्ञांच्या आधारे परिक्षण करण्यात आले आहे. एकुण ६ स्पर्धा प्रकार व २४ उपप्रकारामध्ये एकूण १७ पोलीस अधिकारी व ६५ पोलीस अंमलदार तसेच श्वान पथक यांनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करीत सदर मेळावा खेळी मेळीच्या वातावरणात पार पाडण्यासाठी आपले योगदान दिले. सदर स्पर्धा नि:पक्षपाती व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी त्या त्या विषयाचे तज्ञ परिक्षक लाभलेले होते.

स्पर्धेच्या नियमानुसार चांगले कौशल्य दाखवणाऱ्या पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना एकूण २० सुवर्ण, २० रजत, २० कांस्य पदक प्रदान करण्यात आले. त्यापैकी पालघर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी देदीप्यमान कामगिरी करत एकंदरीत ६ मुख्य विषयांमध्ये पदकांची लयलुट करीत आपल्या नावावर १० सुवर्ण, ०८ रजत व ०९ कांस्य अशा एकूण २७ पदकांसह पदक तालिकेत प्रथम स्थान प्राप्त करुन सर्वसाधारण विजेतेपदावर आपले नाव कोरले. त्यापाठोपाठ सिंधुदुर्ग जिल्हा ०६ सुवर्ण, ०५ रजत व ०२ कांस्य अशा एकूण १३ पदकांसह दुसरे स्थान तर रत्नागिरी जिल्ह्याने ०१ सुवर्ण, ०४ रजत व ०५ कांस्य असे एकूण १० पदक पटकावत तिसरे स्थान प्राप्त केले आहे. ठाणे ग्रामिण व रायगड या जिल्ह्यांनी अनुक्रमे ०६ व ०४ पदकांसह चौथे व पाचवे स्थान प्राप्त केले आहे.

सर्व पदक विजेते यांना श्री. गोविंद बोडके, जिल्हाधिकारी पालघर, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे हस्ते पदक व प्रशस्तीपत्र देवून त्यांचा गौरव करण्यात आला व सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केलेल्या संघास प्रशस्त ट्रॉफी प्रदान करण्यात आली. तद्नंतर सदर स्पर्धा नि:पक्षपाती व पादरर्शकपणे पार पाडण्यासाठी सहयोग करणाऱ्या सर्व परिक्षकांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचे आभार व्यक्त केले.

स्पर्धेअंती श्री. गोविंद बोडके, जिल्हाधिकारी पालघर व श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी सदर स्पर्धेमधील सर्व पदक प्राप्त स्पर्धकांचे तसेच सर्व सहभागी स्पर्धकांचे अभिनंदन केले व भविष्यात राज्यस्तरावर व देशपातळीवर देखील अशाच प्रकारे आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करुन उत्तम कामगिरी करणेकरीता सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.